८. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपिले दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जांव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली बहुतांश माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपाचे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. अपिलार्थी यांनी मागणी केलेली काही माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातून योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. मात्र अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाशी संबंधित मागणी केलेल्या माहितीमध्ये अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) नुसार कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नाही.

९. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी विविध प्राधिकरणाकडे ४४ माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत. अशा मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज करणाऱ्या खालील तक्त्यामध्ये नमूद अपिलार्थी यांची व्दितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळलेली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. त्याकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

| अ.क्र. | अपिलार्थी यांचे नांव | आयोगाकडे दाखल व्दितीय अपिलांची संख्या | आयोगासमोरील सुनावणी / निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | श्री.केशवराजे निंबाळकर | २७८८ | दि.२६.०६.२०२४ |
| २. | श्री.केशवराजे निंबाळकर | ८४२ | दि.१९.१२.२०२४ |
| ३. | श्री.शरद दाभाडे | १५९ | २६.०४.२०२४ |
| ४. | श्री.शरद दाभाडे | ९८५ | दि.२७.०९.२०२४ |
| ५. | श्री.मोतीराम गयबु काळे | ४६३ | दि.२३.०९.२०२४ |
| ६. | श्री.बाळासाहेब भास्कर बनसोडे | २५६ | दि.२०.१२.२०२४ |
| ७. | श्रीमती अनिता नितीन वानखेडे | ११६ | दि.०६.०९.२०२४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | श्री.बाबुराव धोंडु चव्हाण | १९८ | दि.२०.०१.२०२५ |
| ९. | श्री.जयभीम नरसिंगराव सोनकांबळे | १७६ | दि.०१.१०.२०२४ |
| १० | श्री.हरि प्रताप गिरी | २९६ | दि.२८.०८.२०२४ |
| ११ | श्री.विनोदकुमार भारुका | २३६ | दि.२८.०८.२०२४ |
| १२ | श्री.गिरीश म.यादव | २०६ | दि.२३.०८.२०२४ |
| १३ | श्री.संजय हाबु राठोड | १०० | दि.३०.०८.२०२४ |
| १४ | श्री.रायभान किसन उघडे | २१६ | दि.३०.०९.२०२४ |
| १५ | श्री.बालाजी बळीराम बंडे | १५६ | दि.०१.१०.२०२४ |
| १६ | श्री.भालचंद्र साळुंके | १०३ | दि.२४.०१.२०२५ |
| १७ | श्री.मिलिंद दगडु मकासरे | १२५ | दि.३०.०८.२०२४ |
| १८ | श्री.ज्ञानेश्वर धायगुडे | ८६ | दि.२४.०१.२०२५ |
| १९ | श्री.सुरज नंदकिशोर व्यास | ६३ | दि.२४.०१.२०२५ |
| २० | श्री.जनक रामराव गायकवाड | ८१ | दि.०४.०७.२०२५ |

१०. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारांत माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षत माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

११. मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक ०९.०८.२०११ रोजी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where ७५ % of the staff of public authorities spend ७५ % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

१२. मा. उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.२०१८२, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being nay useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

१३. केंद्रीय माहिती आयोगाने CIC/LS/२०१२/०००८५८-SA ते ०००८७२-SA संदर्भात दिनांक ०४.०७.२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

## Earlier Observation of CIC : Shri.M.M.Ansari

In several occasions earlier the central information Commission referred to the issue of repeated RTI requests and harassing tendency. In Prem Prakash Kumar V NFL, Panipat, (Decision No.२४६/IC(A)२००६, F No.CIC/MA/A/२००६/००३७४ & ३७५ dated २८ Auguest २००६) the applicant sought documents and specific comments of CPIO on ८९ queries. The learned Commissioner Shri M.M.Ansari observed that in fact, the nature of queries and information sought are such that the information seeker would never be satisfied because the promotion of self-interest, rather than public interest, was dominant, as the appellant had sought redressed of grievances.

## IN Shri Gopal Soni V The New India Assurance Company Ltd.

(F.No.CIC/AT/A/२००८/०००१७, ०००११६, ०००१२४, dated १२.०६.२००८) learned Commissioner Shri A.N. Tiwari dealt with similar problem. The respondents in the case submitted that the appellant, their employee, was suspended for insubordination and misconduct, and ever since be directed a spate of application containing queries for detailed, voluminous but inane information which would have to be collected and collated from over ३० branches. The Commission held in this case "**answering the elaborate and detailed queries, which have to be both accurate and authentic, imposes heavy cost on the public authority and tends to divert its recourses, which brings it within the scope of section ७ (९) of RTI Act"**

१४. तसेच मा.शैलेश गांधी यांनी नमूद केले आहे की, अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उपयोग कायदेशीर हत्यार म्हणून करीत आहे. जो अत्यंत त्रासदायक स्वरुपाचा आहे. याबाबत खालीलप्रमाणे नमूद केले आहे:

It is relevant here to quote a paragraph from the order of Learned Information Commissioner Shri Shailesh Gandhi in case numbers No.CIC/SG/C/२०११/०००७६०, CIC/SM/२०११/ ०००९२६/SG, CIC/SM/A/२०११/००१११/SG, CIC/SM/A/२०११/००२९०९, dated १७ th January, २०१२) in a second appeal "The commission, at several appellate hearing, has explained to the complainant that under RTI Act, only the information as per records can be made available, multiple RTI applications and appeals would not provide him any information

beyond the records that exists. The Commission recognizes the fact that valuable time of complainant, respondent public authority as well as the Commission is being spent in merely going through the motion prescribed under the RTI Act again and again to obtain similar information..... At this juncture the **Commission would like to mention that the right to information is a fundamental right of the citizens, It cannot be used indiscriminately to fulfill the demand of one individual.** In the present matter. It must be noted that the complainant is pursuing multiple litigation and various public authorities are being asked to divert and extraordinarily disproportionate amount of resources just to respond to hundreds of RTI applications filled by him....**The Commission is also conscious of the fact that it is financed by the poorest man in this country who may be starving to death. The Complainant by repeatedly filling similar RTI application and appeals with the respondent public authority and the commission, is wasting public resources."**

तसेच नमूद केले आहे की, वारंवार माहिती अर्ज करणारे अर्जदार हे माहितीची मागणी / प्रकटीकरण हे त्यांच्या अंतस्थ व्यक्तिगत हेतू साध्य करण्यासाठी करतात, त्यामध्ये व्यक्तिगत हिताचा विचार असल्याने सार्वजनिक हित साध्य होणार नसते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद वैधानिक उद्देश स्पष्टपणे साध्य होत नाही.

१५. प्रस्तुत प्रकरणात संबंधितांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेले निर्णय विचारात घेता, एकाच व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज / अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत / अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास / प्राधिकरणांस वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा मोठ्या स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय

कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांची सर्व ४४ व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

२. **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर** व **नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, छत्रपती संभाजीनगर** यांना असे निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांचेमार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनस्त कार्यालयातील सुचना फलकावर लावून आपल्या स्तरावरुन सुध्दा व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. 7998 दि. 14/07/2025

प्रत :- माहिती तथा यथाशिघ्र कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर.

२. नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, छत्रपती संभाजीनगर.

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ११४३/२०२४**
**बोर्ड क्र.३३**

श्री.सोनवणे शिवाजी आसाराम,
रा.काटेपिंपळगाव, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र 'अ' नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.१०.२०२३ | आपल्या पंचायत समिती कार्यालयातील सर्व विस्तार अधिकारी (पंचायत विभाग) यांनी ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हे मुख्यालयी राहतात किंवा नाही या बाबतीत चौकशी करुन तसा चौकशी अहवाल आपल्या कार्यालयाकडे वर्ग केलेला आहे त्या चौकशी अहवालाची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती ७८ ग्रामपंचायत कार्यालयातील ग्रामसेवक यांच्याशी संबंधित आहे. जन माहिती अधिकारी यांनी ५० ग्रामसेवकाबाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली असुन उर्वरित २८ ग्रामसेवकांची माहिती अद्याप उपलब्ध करुन दिलेली नाही. प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अर्धवट माहिती मिळाली दिली, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक

प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. ४००९ दिनांक : 14/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ११४४/२०२४**
**बोर्ड क्र.३४**

श्री.सोनवणे शिवाजी आसाराम, — अपिलार्थी
रा.काटेपिंपळगाव, ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०८.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.१०.२०२३ | बायोमेट्रीक मशिन खरेदीबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली आहे. सदर माहिती काही विलंबाने प्राप्त झालेली आहे. तथापि प्राप्त झालेली माहिती समाधानकारक असल्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8010 दिनांक : 14/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १५०५ ते १५११/२०२४ (०७)**

श्री.सुर्यकांत अण्णासाहेब गरड,
रा.भिवधानोरा, पो.अगरवाडगाव,
ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, भिवधानोरा,
ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये सात द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.एस.एन.पातकळ व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.एस.एल.चव्हाण उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या सात जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३५ | २५.१०.२०२३ | भिवधानोरा ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व इतर ७ सदस्यांचे नमुना नं.८ प्लॉटच्या क्षेत्रफळासह किंवा त्यांच्या कुटुंबातील ज्या व्यक्तीच्या नावे मिळकत असेल त्या व्यक्तीचे ग्रामपंचायत हद्दीतील नमुना नं.८ मिळणेबाबत, |
| ३६ | २६.१०.२०२३ | ग्रामपंचायत अधिनियम १९५८ आणि त्यापुढील सुधारणाप्रमाणे व ग्रामपंचायतीस लागु असलेल्या कायद्यान्वये कार्यालयातील, सन २०१५ ते सन २०१८ पर्यंत, १.वार्षिक लेखा विवरणे / लेखा परीक्षण अहवाल, २. मागील ०३ लेखा परीक्षण अहवालावर लेखापरीक्षकांनी दिलेली टिपणी, काढलेल्या त्रुटी, ग्रामपंचायतीने दिलेले उत्तर, केलेली सुधारणा, ३. सर्व लेखापरीक्षण अहवाल त्या त्या प्रत्येक वर्षामध्ये ग्रामसभेत सादर केले असल्याच्या ग्रामसभेचे ठराव व इतिवृत्ताची छायाप्रत, ४. लेखी परीक्षण सादर केलेला ग्रामसभेस उपस्थित असणाऱ्या सर्व ग्रामस्थांचया उपस्थिती स्वाक्षरी / अंगठा असलेल्या ग्रामसभा उपस्थित रजिस्टरची छायाप्रत देणे, |

| | | |
|---|---|---|
| ३७ | १०.११.२०२३ | १.ग्रामपंचायत नमुना १३ कर्मचारी वर्गाची सुची व वेतनश्रेणी नोंदवही, २. ग्रामपंचायत नमुना नं.१९ कामावर असलेल्या व्यक्तीची हजेरीपट, ३. ग्रामपंचायत नमुना २१ कर्मचाऱ्याच्या देयकाची नोंदवही, ४. ग्रामपंचायत नमुना नं.२२ स्थावर मालमत्ता नोंदवही (रस्ते व जमिनी व्यतिरिक्त), ५. ग्रामपंचायत नमुना नं.२३ ताब्यातील रस्त्याची नोंदवही, ६. ग्रामपंचायत नमुना नं.२४ जमिनीची नोंदवही, ७. ग्रामपंचायत नमुना नं.२८ मागासवर्गीय १५ टक्के व महिला बाल कल्याण १० टक्के करावयाचे खर्चचे मासिक विवरण नोंदवही, ८. ग्रामपंचायत नमुना नं.३० ग्रामपंचायत लेखी परीक्षण आक्षेप पुर्तता नोंदवही, सन २००५ ते आजपर्यंत, |
| ३८ | २५.१०.२०२३ | ग्रामपंचायत हद्दतील शासकीय सार्वजनिक मोकळया जागा, रस्ते याची नकाशासहीत सुची तयार करुन ती ग्रामपंचायत कार्यालयात ठळकपणे दिसेल यासाठी ग्रामपंचायतने काय व्यवस्था केली आहे याची माहिती, ग्रामपंचायत हद्दीतील नियमांची व कायद्याची उल्लंघन करणारी कृती गावात घडल्यास त्याबाबत अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी यांना दिला जातो, त्या पत्रव्यवहाराची माहिती, |
| ३९ | २५.१०.२०२३ | ग्रामसेवकाने ग्रामपंचायत पातळीवर शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांना ग्रामपंचायतमध्ये एकत्र आणुन ग्रामस्थांची प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने समन्वय साधुन आवश्यक ती कार्यवाही करणेबाबतचा बैठक वृत्तांत व उपस्थिती रजिस्टरची छायांकित प्रत, ग्रामसेवकाने सकाळी १० ते ६ दरम्यान ग्रामपंचायतमध्ये उपस्थित राहणे बंधनकारक आहे, एकापेक्षा अधिक ग्रामपंचायतीचा पदभार असेल तर अशा ग्रामसेवकाने आपण कोणत्या गावी आहोत किंवा शासकीय मिटींगसाठी बाहेर आहोत किंवा सुटीवर आहोत याबाबत ग्रामपंचायतीच्या बोर्डावर तशी नोंद करुन त्या गावी कधी व केव्हा येणार याची माहिती लिहिलेली पाहिजे याबाबत आपण काय व्यवस्था केली याची माहिती मिळणे, |
| ४० | २५.१०.२०२३ | ग्रामपंचायत हद्दीतील शासकीय, सार्वजनिक जागा व रस्ते अतिक्रमणाची नोंद रजिस्टरची छायांकित प्रत मिळणेबाबत, ग्रामपंचायत हद्दीतील अतिक्रमण करुन बांधकाम होणारच नाही यासाठी आजपर्यंत ग्रामपंचायतीने घेतलेली दक्षता याची माहिती मिळणे, ग्रामपंचायत हद्दीतील जुन्या अतिक्रमणधारकास आजपर्यंत कारणे दाखवा नोटीस बजावून संक्षिप्त सुनावणी व किती अतिक्रमण काढले याची माहिती, |
| ४१ | ०९.११.२०२३ | भिवधानोरा गावचे पुनर्वसन करताना शासनाने शाळेसाठी, ग्रामपंचायत व चावडी, बाजार केंद्र, हिरवळ, बोअरवेल व खुली जागा अशा जागा आरक्षित केल्या होत्या, सदरील जागेच्या ताब्याबाबत आजच्या परिस्थिती माहिती द्यावी, ग्रामपंचायत हद्दीतील संपूर्ण प्लॉट नोंद रजिस्टरची छायांकित प्रत मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे बरेच माहितीचे अर्ज दाखल केलेले आहेत. अपिलार्थी यांनी मागणी केलेली काही माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यामुळे माहिती द्यावी किंवा कसे याबाबत त्रयस्थांना विचारणा करण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप, व्याप्ती व कालावधी आणि अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करुन उपलब्ध अभिलेखांचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित करण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी अवलोकनास्तव उपस्थित राहिलेले नाहीत. तसेच असेही नमूद करण्यात येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये माहिती व्यक्तिश: हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिश: माहितीची मागणी करुन अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे व्यक्तिश: संपर्क केलेला नाही. व्यक्तिश: माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहिती शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे..इ. घडामोडी स्वत:हुन ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व आहे. मात्र असे उत्तरदायित्व

अपिलार्थी यांनी पार पाडलेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न देणे / दिलेली माहिती समाधानकारक न देणे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत. प्रसंगावशात, मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर सिव्हिल अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त सात व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8011 दिनांक : 14/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ११०८ ते १११२/२०२४ (०५)

श्री.शेख शफिक शेख अजीम, — अपिलार्थी
रा.शहानगर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),
वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, एस.एस.सी. बोर्डसमोर, रेल्वेस्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक (वनीकरण),
वन विभाग, छत्रपती संभाजीनगर, वनभवन, उस्मानपुरा, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०६.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये पाच द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, श्री.सागर बा.कुंटे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (वनीकरण), श्रीमती आशा चव्हाण उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या पाच जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४२ | ३०.०८.२०२३ | आपल्या कार्यालयअंतर्गत वनपरिक्षेत्र हद्दीमध्ये जसे की, सातारा, देवळाई या वनपरिक्षेत्रामध्ये गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या आदी जनावरांच्या चराईसाठी दिलेल्या परवानगीची छायांकित प्रत, यासाठी कार्यालयाने दिलेल्या आदेशाची छायांकित प्रत, याबाबतचे वनखात्याची नियम, नियमावली, शर्ती, अटी, शासन परिपत्रक याबाबतचे सविस्तर माहिती, सन २०२१-२०२२-२०२३, |
| ४३ | ३०.०८.२०२३ | आपल्या कार्यालयअंतर्गत कार्यान्वित असलेले मजुर व वनमजुरनिहाय एकुण संख्या, त्यांची नावे, यादी, ते कुठेकुठे ड्युटी करतात, त्यांची स्थळनिहाय कामाची नावे, कामाचा प्रकार, फोटोसहीत, मजुर, वनमजुरनिहाय नावासह संख्येसह अहवाल, हजेरीपटाची छायांकित प्रत, रोस्टरची रोजनामाची छायांकित प्रत, त्यांना देण्यात येणारे वेतन श्रेणी, ते ज्या पध्दतीने दिले त्याचे वर्णन जसे की, बँकेमार्फत, रोखीने, आरटीजीएस, चेकव्दारे याची माहिती, सन २०२१-२०२२-२०२३, |
| ४४ | ३०.०५.२०२३ | सातारा देवळाई येथील वनविभागाच्या हद्दीतील असलेले जंगलातील गट क्र.२०६८, २५०, ३३०, ३१, ७३ या गटातील विहीरीमधुन शेजारील शेतकरी पाणी उपसा करत |

| | | |
|---|---|---|
| | | आहे, तरी सदर आपल्या वनखात्याच्या विहीरीतून पाणी उपसा करण्यासाठी दिलेल्या परवानगीची छायांकित प्रत, तसेच आपल्या वनविभागाच्या हद्दीतील जमिनीमधुन लाईटचे पोल, विज पुरवठा करण्यासाठी आपल्या कार्यालयाने दिलेल्या परवानगीची छायांकित प्रत / नाहरकत प्रमाणपत्राची छायाप्रती, सन २०२०-२१ ते २०२२-२३ |
| ४५ | ३०.०५.२०२३ | मौजे सातारा परिसर येथील आपल्या वनविभागच्या असलेली जागा गट क्र.२०६८, २५०, ३३० या गटामधुन माती, मुरुम उत्खनन करण्यासाठी आपल्या कार्यालयाकडुन देण्यात आलेल्या परवानगीची छायांकित प्रत, तसेच आपल्या हद्दीतील वृक्ष तोड करण्यासाठी दिलेल्या आदेशाची / परवानगीची छायांकित प्रत, सन २०२०-२१ ते २०२२-२३, |
| ४६ | ३०.०५.२०२३ | मौजे देवळाई येथील आपल्या वन विभागाच्या असलेली जागा गट क्र.३१, ७३ या गटामधुन व जंगलातुन माती मुरुम उत्खनन करण्यासाठी आपल्या कार्यालयाकडुन देण्यात आलेल्या परवानगीची छायांकित प्रत तसेच आपल्या हद्दीतील वृक्ष तोड करण्यासाठी दिलेल्या आदेशाची / परवानगीची छायांकित प्रत, सन २०२०-२१ ते २०२२-२३, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी शुल्क भरुन माहिती घ्यावी असे कळविलेले आहे. परंतु किती शुल्क किती पृष्ठ याचा कोणताही तपशिल कळविलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे माहिती घेण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहिलो असता त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे. वन विभागाकडुन नियमांचे उल्लघंन झालेले आहे. मात्र याची खात्री करण्याकरिता माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व मोठ्या कालावधीची आहे. अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे बरेच माहितीचे अर्ज दाखल केलेले आहेत. अपिलार्थी यांच्या बोर्ड क्र.४२ व ४३ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२३.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, शुल्काचा भरणा करुन माहिती घेण्याचे व यासाठी हजर राहण्याचा वेळ व दिनांक सात दिवस आगोदर कळविण्याचे अपिलार्थीस सुचित केलेले आहे. तथापि याबाबत अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. तसेच अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.४४, ४५ व ४६ मधील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या अधिनस्त वनपरिमंडळ अधिकारी, छत्रपती संभाजीनगर-२ यांचेशी संबंधित असल्यामुळे या माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज त्यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असुन आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. तसेच असेही नमूद करण्यात येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये माहिती व्यक्तिशः हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुन अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे व्यक्तिशः संपर्क केलेला नाही. व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसे माहिती शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वत:हुन ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व आहे. मात्र असे उत्तरदायित्व अपिलार्थी यांनी पार पाडलेले नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यात आलेले असुन माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ / माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), वनपरिक्षेत्र कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या पाचही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली

व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज **२५** पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज **२५** पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क देण्यात यावी.

२. सहायक वनसंरक्षक (वनीकरण), वन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह पाच व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रि २।।ई

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 8008 दिनांक : 14/07/2025

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १११८ व १११९/२०२४ (०२)

श्री.अहमद खान करीम खान,
रा.दरगाह हजरत ख्वाजा शाह महमूद व मददगार साहेब, मौजे कुतुबपुरा-जयसिंगपुरा, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक अधीक्षक,
महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०७.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक, श्री.एम.के.बेग उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४७ | २०.११.२०२३ | मा.वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद यांचे न्यायालयात केस क्रमांक ९९/२०१३ च्या अनुषंगाने विरुध्द पक्ष सय्यद जियाउद्दीन अल्ली यांनी सर्वे क्रमांक ४७, ३ व ४१ , सिटी सर्वे क्रमांक ३८२ ते ३९५ संबंधी मालकी हक्काची कागदपत्रे व महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद येथे करण्यात आलेल्या रजिस्ट्रेशनच्या प्रती साक्षांकित स्वरुपात सादर केले किंवा कसे, त्यासंबंधी माहिती देण्यात यावी, जर केले नसतील तर माहिती निरंक आहे असे स्पष्ट लिहुन देण्यात यावे, |
| ४८ | २०.११.२०२३ | मा.वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद यांचे न्यायालयात केस क्रमांक ३/२०१२ च्या अनुषंगाने विरुध्द पक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यातर्फे सर्वे क्रमांक ४७, ३, ३/१ व ३/२, ४१, सिटी सर्वे क्रमांक ३९४, ३९५, २३५ संबंधी मालकी हक्काचे सादर केले किंवा कसे, त्यासंबंधी माहिती देण्यात यावी, जर केले नसतील तर माहिती निरंक आहे, असे स्पष्ट लिहुन देण्यात यावे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२१.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत

करण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी अशी वस्तुस्थिती व्यक्तिश: प्राप्त करुन घेऊन पोच दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.०१.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील फेटाळलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकीची व खोटी, दिशाभूल करणारी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२१.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती न्यायीक प्रकरणाशी संबंधित असल्यामुळे सदर माहिती महाराष्ट्र जिल्हा न्यायालय माहिती अधिकार (सुधारित) नियम, २००९ च्या प्रकरण १० (३) व फॉर्म-सी मधील कारण क्रमांक २ नुसार देता येत नसल्याचे कळवुन मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती न्यायाधिकरणाच्या नक्कल विभागात दिवाणी संहितेचे नियम व अटीस अधीन राहुन प्रमाणित प्रत मिळणेबाबतचा रितसर अर्ज सादर करुन नियमाप्रमाणे प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सुचित केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२५.०१.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही. प्रसंगावशात, अपिलार्थी यांनी त्यांना हवी असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे कार्यवाही करुन प्राप्त करुन घेणे संयुक्तिक ठरेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7996 दिनांक : 14/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १३०९ व १३१०/२०२४ (०२)

श्री.प्रदिप बाबुलाल भारुका,
भारुका मेडिकल, मेन रोड, कन्नड,
ता.कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा,
कर निर्धाकण सेवा,
नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक आयुक्त,
नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक सेवा, श्री.एस.के.निकम उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४९ | - | व्दितीय अपील क्र.७३३५/२०२० सुनावणी दि.२४.०५.२०२३ राज्य माहिती आयोगाच्या आदेशावर करण्यात आलेली कारवाईची माहिती मिळणे, |
| ५० | - | मा.राज्य माहिती आयोग व्दितीय अपील २३३/२०२३ सुनावणी दि.२५.०८.२०२३ च्या आदेशावरील कारवाईची संपूर्ण माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती नगर परिषद कन्नड कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचे माहिती अर्ज नगर परिषद कन्नड कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाशिवाय इतर सर्व माहिती अर्ज जे अपिलार्थी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केलेले आहेत ते सर्व अर्ज नगर परिषद कन्नड कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे त्या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत

केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती नगर परिषद कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचे माहितीचे अर्ज नगर परिषदकडे वर्ग केलेले आहेत. तथापि या संदर्भातील पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या पटलावर सादर केला असल्याचे दिसुन येत नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी / प्राधिकरणाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसाच्या आत माहितीशी संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार मुदतीत सुसंगत हस्तांतरण झाले किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. म्हणून अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आता जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार माहितीशी संबंधित कार्यालयाकडुन एकत्रित / हस्तांतरित करुन ती अपिलार्थी यांना द्यावी लागेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारण सेवा, नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या दोनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली माहिती ज्या कार्यालयाशी / प्राधिकरणाशी संबंधित आहे ती त्या कार्यालयाकडुन / प्राधिकरणाकडुन अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सहायक आयुक्त, नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 7997 दिनांक : 14/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक - ९०१३/२०२४**
**बोर्ड क्र.५१**

डॉ.भाऊसाहेब सुर्यभान रंधे,
रा.मुधलवाडी, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, श्री.राजेश एस.कांबळे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०४.२०२४ | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र अंतर्गत मुधलवाडी-नारायणगाव शिव रस्त्यावरील मुधलवाडी-नारायणगाव चौफुली गट नं.५२ पासुन दक्षिणेकडे (कातपूर), नाथवाले शेत ग.नं.८२ पर्यंतच्या रस्त्याच्या कामाची माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१५.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन मागणी केलेली माहिती www.nrega.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्यामुळे ती संकेतस्थळावर घेऊ शकता किंवा अशी माहिती डाऊनलोड करुन देण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. आज रोजीच्या आयोगासमोरील सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमोर देण्याकरिता सोबत देखील आणलेली आहे. आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे ती अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेले आहे. तथापि आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती

संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8012 दिनांक : 14/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ९०१४ व ९०१६/२०२४ (०२)

डॉ.भाऊसाहेब सुर्यभान रंधे,
रा.मुधलवाडी, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, मुधलवाडी,
ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.११.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.आर.डी.चौधरी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.खराद डी.बी. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५२ | २४.०४.२०२४ | मुधलवाडी गावातील पूर्वेकडील मारोती मंदीर ते सोमनाथ जाधव यांच्या शेतापर्यंतचे नाल्यांचे सांडपाणी, साफसफाई ग्रामपंचायतीने केलेल्या कामाबाबत ५ मुद्यांवर माहिती, |
| ५४ | २२.०४.२०२४ | महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना महाराष्ट्र अंतर्गत मुधलवाडी-नारायणगाव शीव रस्त्यावरील मौजे मुधलवाडी-नारायणगाव चौफुली ग.नं. पासुन दक्षिणेकडे कातपूर नाथवाले शेत ग.नं.८२ रस्ता मातीकाम व खडीकरणाच्या कामाबाबत ७ मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी बोर्ड क्र.५२ मधील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात कोणतेही काम ग्रामपंचायत कार्यालयाकडुन करण्यात आलेले नसल्यामुळे माहिती निरंक आहे. तसेच बोर्ड क्र.५४ मधील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये माहिती व्यक्तिश: हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिश: माहितीची मागणी करुन अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे व्यक्तिश: संपर्क केलेला नाही. त्यामुळे माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस देता आलेली नाही. अत: अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर

दि.२६.०७.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे १५ दिवसात नियमानुसार माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मुधलवाडी, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 8063 दिनांक : 15/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक - ९०१५/२०२४**
**बोर्ड क्र.५३**

डॉ.भाऊसाहेब सुर्यभान रंधे,
रा.७१७, हनुमाननगर, मुधलवाडी,
ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०४.२०२४ | आश्वासित कालबध्द पदोन्नतीचे लाभ मिळणेबाबत डॉ.भाऊसाहेब सुर्यभान रंधे तत्कालीन वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र पिंपळवाडी, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांचे अर्ज दि.३०.१०.२०२३ आपल्या कार्यालयास प्राप्त दि.०२.११.२०२३,<br>१. उपरोक्त नमूद माहितीचे विषयात नमूद अर्जाचा आवक क्रमांक व दिनांकीत टिपणीची प्रत,<br>२. वरील अर्जाबाबतच्या सर्व टिपणीची स्वाक्षरी प्रत,<br>३. वरील अर्जावर टिपण्या करण्यास सर्व बाधील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे संपूर्ण नाव व पदनाम, कार्यालयीन पत्ता,<br>४. वरील अर्जावर केलेल्या कार्यवाहीची स्वाक्षरीत प्रत,<br>५. माहितीच्या विषयात नमूद अर्जाची स्वाक्षरीत प्रत, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न

दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8064 दिनांक : 15/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ९३३६ ते ९३५६/२०२४ (२१)
बोर्ड क्र.५५ ते ७५

श्री.परमेश्वर विनायक डांगे,
रा.नवगाव, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, नवगाव, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र. १

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र. २

(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२१.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये २१ द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलांची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.एम.डी.भोसले व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.डी.बी.खराद उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या २१ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५५ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथील १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत आलेला एकुण निधी व त्यामधुन केलेल्या सर्व कामांची इस्टीमेट, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेशाच्या प्रती, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिले बाब निहाय माहिती, मार्च २०२१ ते आजपर्यंत, |
| ५६ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथील १५ व्या वित्त आयोगाच्या बँक खात्याचे स्टेटमेंट प्रत, मार्च २०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ५७ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथील २०:१५ चा आलेला निधी व ग्रामनिधी खात्यात आलेला निधी या दोन्ही बँक खात्याचे स्टेटमेंट प्रत देण्यात यावी, मार्च २०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ५८ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथील १५ वा वित्त आयोग, ग्रामनिधी, २५:१५ निधी, तसेच वार्षिक वित्तीय अहवाल या सर्वाचे वर्षनिहाय वार्षिक अहवालाच्या प्रती, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ५९ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथील ग्रामपंचायत मधील झालेल्या मासिक सभेच्या इतिवृत्तांताच्या ठरावाच्या (प्रोसेडिंग बुक नक्कल संपूर्ण कालावधीचे) छायांकित प्रती, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ६० | २०.०७.२०२४ | ग्रा.पं. नवगाव येथील ग्रामसभेत घेतलेल्या इतिवृत्तांत ठरावाच्या प्रती, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |

| | | |
|---|---|---|
| ६१ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथील ग्रामपंचायत अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट रस्त्याचे व समाज मंदिर दुरुस्ती कामाचे इस्टीमेट अभिलेखे, जीएसटी बिल, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ६२ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथील ग्रामपंचायत अंतर्गत नवगाव, तुळजापूर, रामनगर या जि.प.शाळा दुरुस्ती कामांची इस्टीमेट, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिल, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ६३ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथे रोजगार हमी योजनेतुन आलेले पाणंद रस्त्यांच्या सर्व कामांची इस्टीमेट, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूणत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिल, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ६४ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथे रोजगार हमी योजनेतुन आलेले सिमेंट रस्ते कामांची इस्टीमेट, एम.बी. रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिल, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ६५ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथील ग्रामपंचायत अंतर्गत बसस्टँड ते ग्रा.पं.नवगाव पर्यंत झालेल्या सिमेंट रस्त्याचे कामाचे इस्टीमेट, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिल, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ६६ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथे रोजगार हमी योजनेतुन आलेले पेव्हर ब्लॉकच्या सर्व कामांची इस्टीमेट, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जी.एस.टी.बिले, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ६७ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथील २५:१५ अंतर्गत आलेला एकुण निधी व त्या मधुन केलेल्या सर्व कामांची इस्टीमेट, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिल, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ६८ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथील २५:१५ अंतर्गत आलेला एकुण निधी व त्या मधुन केलेल्या सर्व कामांची इस्टीमेट, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिल, दि.०१.०१.२०२१ ते दि.३१.१२.२०२२, |
| ६९ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगांव येथील २५:१५ अंतर्गत आलेला एकुण निधी व त्या मधुन केलेल्या सर्व कामांची इस्टीमेट, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिल, दि.०१.०१.२०२४ ते आज दिनांक पर्यंत, |
| ७० | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगांव येथील ग्रामपंचायत अंतर्गत करण्यात आलेल्या अंडर ग्राऊंड नाल्या (गटार) कामांची इस्टीमेट, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिल, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ७१ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं. नवगाव येथील ग्रामपंचायत अंतर्गत जिल्हा नियोजन निधीतुन स्मशानभुमीतील डोम, स्मशान शेड, आर.सी.सी.बांधकाम, पेव्हर ब्लॉक, कंपाऊंड वॉल, बोअर वेल, कामांची इस्टीमेट, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिले, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ७२ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथील ग्रामपंचायत अंतर्गत जिल्हा नियोजन निधीतुन मुस्लिम कब्रस्तानमधील डोम, स्मशान शेड, आर.सी.सी.बांधकाम, पेव्हर ब्लॉक, कंपाऊंड वॉल, बोअर वेल, कामांची इस्टीमेट, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिले, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ७३ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथील ग्रामपंचायत अंतर्गत जिल्हा नियोजन निधीतुन गावातील तुळजाभवानी मंदिर परिसरातील डोम, पेव्हर ब्लॉक या कामांची इस्टीमेट, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिले, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |
| ७४ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथील २५:१५ अंतर्गत आलेला एकुण निधी व त्या मधुन केलेल्या सर्व कामांची इस्टीमेट, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिले, दि.०१.०१.२०२३ ते दि.३१.१२.२०२३, |

| | | |
|---|---|---|
| ७५ | २०.०७.२०२४ | ग्रा.पं.नवगाव येथे जिल्हा नियोजन अंतर्गत आलेला एकुण निधी व त्या मधुन केलेल्या सर्व कामांची इस्टीमेट, तसेच स्मशानभूमीचे काम, एम.बी.रेकॉर्ड, कार्यारंभ आदेश प्रत, काम पूर्णत्वाचे दाखले, दस्त अभिलेखे, जीएसटी बिले, दि.०१.०१.२०२१ ते आज दिनांकपर्यंत, |

२. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांची पाठराखण करत अवलोकनांती केवळ ५० पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. माहिती अर्ज सादर करताना त्यामध्ये कागदपत्रांची मागणी केलेली आहे. सदर माहिती अर्जात अवलोकनाबाबत उल्लेख केलेला नाही. त्यामुळे पारित केलेले सदर प्रथम अपील आदेश सुसंगत नाहीत. माहिती अर्जान्वये ज्या आणि जेवढ्या माहितीची मागणी केलेली आहे तेवढी सर्व माहिती कागदपत्र स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

३. आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी हे वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज सादर करतात. या सर्व माहिती अर्जावर अपिलार्थी प्रथम व व्दितीय अपील दाखल करतात. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिलेला, असतानाही अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नाही, माहिती देण्यास टाळाटाळ... अशा कारणांचा ऊहापोह करुन प्रथम अपिले दाखल केलेली आहेत. अपिलार्थी यांनी एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज सादर केलेले आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार प्राप्त झालेल्या माहिती अर्जावर कार्यवाही करण्याकरिता ३० दिवसाची कालमर्यादा निश्चित केलेली आहे. तथापि एका वेळी एकाच अर्जदाराचे एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले तरी या सर्व अर्जावर ३० दिवसात कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र दैनंदिन कामकाजाचा व्याप विचार घेता अशा मोठ्या प्रमाणावर प्राप्त झालेल्या अर्जावर दैनंदिन कामकाज सांभाळून कार्यवाही करताना तारेवरची कसरत करावी लागते. अपिलार्थी यांच्या अशा मोठ्या प्रमाणावर अर्ज करण्याच्या भूमिकेचा विपरित परिणाम, दैनंदिन शासकीय कामकाजावर होऊन नियमित शासकीय कामे प्रलंबित राहुन गरजू नागरिकांना नैसर्गिक न्याय देता येणे शक्य होत नाही.

४. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीचे अवलोकन करणेबाबत सुचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन केलेले नाही. वास्तविक त्यांनी अवलोकन करुन नेमकी माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. तथापि त्यांनी असे करण्याऐवजी प्रथम अपिले दाखल केलेली आहेत. सदर प्रथम अपिलाच्या अनुषंगाने सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांचा प्रतिसाद विचारात घेऊन अपिलार्थीस अवलोकनांती प्रति अर्ज केवळ ५० पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे.

५. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे मुद्दामहुन टाळण्याचा प्रयत्न केला, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

६. माहिती अधिकार कायद्यामध्ये माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी माहितीचा मूळ उद्देश हा आहे की, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा आहे. मोठ्या प्रमाणात माहिती अर्ज केल्याने शासकीय कामात अडथळा निर्माण होऊन शासकीय कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होतो.

एकाच व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज / अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत / अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास / प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालयाचे / प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा अमर्यादित स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची

पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

७. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक ०९.०८.२०११ रोजी या प्रकरणी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी दिलेल्या निर्णयामध्ये, माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधले असुन या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where ७५ % of the staff of public authorities spend ७५ % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

८. यावरुन माहिती अधिकार कायद्यांतर्गत पुन्हा पुन्हा माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी, अपिलाशी संबधित कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ इतर शासकीय कामकाज करण्यासाठी देणे शक्य होत नाही. तसेच पुन्हा तोच विषय व्दितीय अपिलापर्यंत आल्यास माहिती आयोगाला क्रमवारीनुसार प्राप्त झालेल्या इतर व्दितीय अपिलांच्या सुनावणीसाठी वेळ देणे शक्य होत नाही.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाकडील निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्रीवर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. अपिलार्थी यांची उपरोक्त २१ व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना असे निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांचेमार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनस्त कार्यालयातील सुचना फलकावर लावून आपल्या स्तरावरुन सुध्दा व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.------------- दिनांक :-------------------

प्रत :- माहिती तथा यथाशिघ्र कार्यवाहीसाठी अग्रेषित,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक - १५९१ व १५९२/२०२४ (०२)

श्री.रायभान किसन उघडे,
रा.१४०, रामकृपा कॉलनी (म्हाडा), दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२८.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले, तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, श्री.राजेश एस.कांबळे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.बी.डी.राठोड, विस्तार अधिकारी (पं) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ७६ | दि.२६.०७.२०२४ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र - जा.क्र.जिपऔ/कावि/पं-७/७६९२, दि.११.०९.२०१९ चे अर्जदाराचे दि.२०.०१.२०२३ चे पत्रावरील कार्यवाही अहवाल, कार्यालयीन टिपणी व दोषीविरुध्दची संपूर्ण माहिती, |
| ७७ | दि.२५.०७.२०२४ | सहा.गविअ पंचायत जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र. जिपऔ/पंचायत / आस्था - १ / कावि / २०१९ / ६१४१, दि.१४.०८.२०१९ व अर्जदाराचे दि.२०.०९.२०२४ चे पत्रावरील कार्यवाही अहवाल, कार्यालयीन टिपणी सह संपूर्ण माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना दि.०७.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच सदरची माहिती अपिलार्थी यांना आयोगासमोर देण्याकरिता आज रोजी सोबत देखील आणलेली आहे. आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे ती अपिलार्थीस देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्यापी

माहिती अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमोर देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती आयोगासमोर स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8065 दिनांक : 15/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - ९१८१/२०२४
बोर्ड क्र.७८

श्री.अनिल मोतीलाल बारवाल,
श्री.फारोळा, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, फारोळा, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१७.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्रीमती ए.ए.तुपे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री.बी.बी.राठोड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र 'अ' नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.०३.२०२४ | १. ग्रा.पं. ने १० सप्टेंबर २०२० ते १५ मार्च २०२४ पर्यंत जी विकास कामे केलेली आहे, त्या कामाचे कामाचे ठरावासहीत प्रशासकीय मान्यता पत्र व इस्टीमेट, केलेल्या कामाचे एमबी रेकॉर्डसहीत अदा केलेले चेक किर्द बुक सहीत देणे व इतर १५ मुद्यांवर माहिती ज्यामध्ये ग्रामसभा, करमागणी, प्लॉटींग लेआऊट, करआकारणी, दारिद्र्यरेषा यादी, पाणीपुरवठा कर्मचारी, विकास कामे, मासिक मिटींग, १५ वा वित्त आयोग, संगणक चालक..इ. माहितीचा समावेश आहे. |

आज रोजी सुनावणीच्यादरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही माहिती दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची आहे. तसेच ती एका पेक्षा जास्ती विषयाशी संबंधित आहे. अपिलार्थी यांनी माहितीची मागणी करताना ती १५० पेक्षा अधिक शब्दांव्दारे केलेली आहे. तसेच अपिलार्थी यांनी त्यांना व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे त्यांच्या माहिती अर्जामध्ये नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने एका मुद्याची

माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची असुन ती एका पेक्षा जास्त विषयाशी संबंधित आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अर्जदार यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर १५० शब्दाच्या मर्यादेत माहितीची मागणी अनुज्ञेय आहे. या सर्व बाबी विचारात घेता, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.: 8066 दिनांक : 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ६९८२/२०२४**
**बोर्ड क्र.७९**

श्रीमती मोनिका राज नाटकर, — अपिलार्थी
रा.कातपुर, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, ईसारवाडी,
ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.दानवे एस.जे. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), श्री.अनिल ह. वडते उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०४.२०२४ | आपल्या कार्यालयातील जन्मनोंद तसेच विवाह नोंद तपास करुन मिळण्याबाबत, सदर जन्म नोंद प्रमाणपत्र करिता लागणारी माहिती व मुलाचे वडील रंजीत प्रभाकर बोरुडे आई दिपाली रंजीत बोरुडे तसेच मुलाचे नाव राजरत्न रंजीत बोरुडेची जन्म दि.२६.०२.२०१८ नोंद वहीनुसार प्रमाणपत्र साक्षांकित करुन मिळावे, रंजीत प्रभाकर बोरुडे व दिपाली रंजीत बोरुडे यांचा विवाह नोंदनुसार तपास करुन सन २०१७ चे प्रमाणपत्र सत्यप्रती साक्षांकित करुन मिळावे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करुनही माहिती दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज कार्यालयास अप्राप्त असल्यामुळे सदर अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन माहिती अपिलार्थीस देता येणे शक्य झालेले नाही. आयोगासमोरील सुनावणीसाठीच्या नोटीससोबत अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज कार्यालयास प्राप्त

झालेला आहे. सदर माहिती अर्जाचे अवलोकन करुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने उपलब्ध अभिलेखाची शहानिशा केली असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील नोंद अभिलेखात आढळुन येत नसल्यामुळे सदर माहिती निरंक आहे. सदर बाब अपिलार्थीस आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, ईसारवाडी, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8067 दिनांक : 15/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ६९८३/२०२४**
**बोर्ड क्र.८०**

श्रीमती मोनिका राज नाटकर,
रा.कातपुर, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, कातपूर
ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०२.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (प), श्री.खराद डी.बी. उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०४.२०२४ | ग्रामपंचायत कार्यालय कातपूर आयोजित ग्रामसभेचे आशा स्वयंसेविकेचे ठराव मिळण्याबाबत, सन २०२२ ते २०२४, दिपाली दशरत अडसुळे यांची आशा स्वयंसेविका म्हणून निवड करण्यात आलेला ठराव मिळावा, सदर ग्रामसभेसाठी किती सदस्य व सरपंच उपसरपंच तसेच गावातील ग्रामस्थ हजर होते, त्यांचे सही असलेले नोंदवही सत्यप्रती साक्षांकित करुन मिळावे, सदर जाहीर प्रगटनची सत्यप्रत मिळावी, सदर ग्रामसभेचा व्हिडिओ पेनड्राईव्हमध्ये मिळावा, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करुनही माहिती दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन

माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कातपूर, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8068 दिनांक : 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ८८२४/२०२४**
**बोर्ड क्र.९५**

श्री.जगदीश तुळशीराम बिरसने,
रा.गल्ली क्र.११, डॉ.आंबेडकरनगर, सिडको, एन-७,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग -२,
सह जिल्हा निबंधक वर्ग-१ कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नोंदणी व मुद्रांक विभाग इमारत,
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०४.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, श्रीमती व्ही.पी.भूमकर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०७.२०२४ | १.मा.नोंदणी उपमहानिरीक्षक तथा जिल्हाधिकारी मुद्रांक उपनियंत्रक, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांनी दि.१७.१२.२०२१ रोजी लेखी तक्रार अर्ज सादर करण्यात आला, सदरील तक्रार अर्जावर आज दि.०२.०७.२०२४ पर्यंत करण्यात आलेली कार्यवाही याची सर्व संचिका, कागदपत्रे, फाईल याची छायांकित प्रत देण्यात यावी,<br>२.मा.नोंदणी उपमहानिरीक्षक तथा जिल्हाधिकारी मुद्रांक उपनियंत्रक औरंगाबाद उपविभाग औरंगाबाद यांना दि.१७.१२.२०२१ रोजी लेखी तक्रार अर्ज सादर करण्यात आला, सदरील अर्जानुसार आपल्या कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांच्यावर आज दि.०२.०७.२०२४ पर्यंत करण्यात आलेली कार्यवाही याची संपूर्ण माहिती कागदपत्राच्या पुराव्यासह देण्यात यावी,<br>३.मा.नोंदणी उपमहानिरीक्षक तथा जिल्हाधिकारी मुद्रांक उपनियंत्रक औरंगाबाद उपविभाग औरंगाबाद यांना दि.१७.१२.२०२१ रोजी लेखी तक्रार अर्ज सादर करण्यात आला, सदरील अर्जानुसार आपल्या कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांचेवर कारवाई संदर्भात वरिष्ठ कार्यालयाकडुन प्राप्त नोटीसा, पत्र व इतर दस्ताऐवज याची सर्व झेरॉक्स प्रत देण्यात यावी,<br>४. मा.नोंदणी उपमहानिरीक्षक तथा जिल्हाधिकारी मुद्रांक उपनियंत्रक, औरंगाबाद उपविभाग औरंगाबाद यांना दि.१७.१२.२०२१ रोजी लेखी तक्रार अर्ज सादर करण्यात आला, सदरील |

| | |
|---|---|
| | तक्रार अर्जावर आज दि.०२.०७.२०२४ पर्यंत दाखल एनसीआर व एफआयआर याची झेरॉक्स प्रत देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन प्रथम अपील अमान्य केलेले आहे. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०२.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेल्या माहितीसंदर्भात अभिलेख स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर माहिती उपलब्ध करुन दिल्याबाबतची बाब प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विचारात घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील अमान्य केलेले आहे. अपिलार्थीस माहिती मिळाली नसल्यास कार्यालयात अभिलेख स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थीस वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने पुन:श्च उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, सह जिल्हा निबंधक वर्ग-१ कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सह जिल्हा निबंधक वर्ग-१, तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

१५।७।२५

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8069 दिनांक : 15/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक - १११२५अ व १११२६अ/२०२४ (०२)

ॲड.प्रविण देविदास निवारे,
रा.जुने कावसान, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, जुने कावसान,
ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०८.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१८.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.आर.एच.कावसानकर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री.अनिल ह.वडते उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ९९ | १४.१०.२०२४ | १. सन २०१९ ते २०२४ नवीन घरांचे फेरफार व आठ अ चे उतारे,<br>२. ॲड.देविदास जनार्धन निवारे यांच्या नावावर असलेली मारोती मंदिरासमोरील जागेचे व सरकारी वट्टा याची प्रोसेडिंग नोंद, ठराव व कोणत्या ठरावाने शासकीय ग्रामपंचायत कार्यालयाची माहिती,<br>३. आता सन २०१८ पासुन आजपर्यंत ग्रामपंचायत अंतर्गत दलित वस्ती व कोणकोणते फंड याची व एम.बी. ठरावाची प्रत मिळणेबाबत,<br>४. ग्रामपंचायत कार्यालय चालू असल्याची वेळ व तेथे नियुक्ती असलेल्या लोकांची वेळ व ग्रामसेवक यांचे येण्याचा वेळ व त्यांचे कामकाजाची वेळ महिन्यात किती दिवस, |
| १०० | १०.०९.२०२४ | जुने कावसान येथील चालु ग्रामपंचायतीचे वेळापत्रक व महिन्यातुन किती दिवस चालु असते याबाबतची माहिती, तसेच ग्रामसेवक यांचे चालु मोबाईल नंबर व ग्रामसेवक यांची येण्याची वेळ व जाण्याची वेळ आठवड्यातुन किती दिवस, ग्रामपंचायत मधील असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी, १७ व्या वित्त आयोगाच्या झालेल्या कामकाजाची यादी व ठराव, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२९.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन आठ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस पोस्टाने पाठविण्यात आलेली आहे. तथापि सदरची माहिती अपिलार्थीस स्विकारण्यास नकार दिल्याने सदर माहितीचे टपाल कार्यालयाकडे परत आलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असुन आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे आठ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही माहिती देण्यात आलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केलेले कोणतेही टपाल पोस्टाने प्राप्त झालेली नाही. त्यामुळे ते स्विकारण्यास नकार देण्याचा प्रश्नच उद्‌भवलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कावसान, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 8070 दिनांक : 15/07/2025